# महा मेट्रो तर्फे ३० मानकऱ्यांचा सन्मान

## मानाचा मुजरा

### आदरणीय सौ. वैशाली भानुदास खांदवे-हुलावळे, गुणवत्ता, निष्ठा आणि सामाजिक बांधिलकीचा प्रवास



सौ. वैशाली भानुदास खांदवे-हुलावळे, च.. इ.एव. पदवीधर, यांनी अखंड ३४ वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत राहून पुणे शहरातील शिक्षणाचा प्रसार आणि गुणवत्ता वृद्धीसाठी अपूर्व योगदान दिले आहे. सध्या त्या पुणे मनपा विद्यानिकेतन क्रमांक १७, विश्रांतवाडी येथे कार्यरत आहेत.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी त्यांनी सदैव अधिक वेळ देत विविध स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन केले असून त्यांच्या शिस्तप्रियता, जाननिष्ठा आणि विद्यार्थ्यांबद्दलच्या आत्मीयतेमुळे शिष्यवृत्ती, छ्चचड, मंथन, चढड, हिंदी राष्ट्रभाषा सभा आणि भारती विद्यापीठ अशा विविध परीक्षांत सुमारे ७५ विद्यार्थी गुणवंत ठरले आहेत. शालेय जीवनाचे आकर्षण, ज्ञानार्जनाची ओढ, राष्ट्रप्रेम आणि सांस्कृतिक मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

साक्षरता अभियान, राष्ट्रीय समूहगान, जनगणना, निवडणूक कर्तव्य, इड्ज कार्य आणि कोविड काळातील जबाबदाऱ्या त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडल्या आहेत. नाट्यप्रवेश, लोकनृत्य, सम ूहगान आणि गायन स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना घडवून त्यांनी अनेक यश मिळवून दिले आहेत. जवाहर नवोदय विद्यालयाच्या स्पर्धेत त्यांनी तयार केलेल्या विद्यार्थ्यपिकी एक विद्यार्थी पुणे जिल्ह्यातील हजार विद्यार्थ्यांमधून निवडला जाऊन उइडए बोडति बारावीपर्यंत मोफत शिक्षण घेऊ शकला. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव दूरचित्रवाणीवरही झाला असून राज्यस्तरीय आणि तालुकास्तरीय प्रशिक्षणांमध्ये त्यांनी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून योगदान दिले आहे. कोविंड काळात गरजू विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन स्वखर्चाने जीवनावश्यक वस्तू पुरवून त्यांनी सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले आहे.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### आदरणीय सौ. सुलभा अनिल क्षीरसागर, सामाजिक कार्य



सौ. सुलभा अनिल क्षीरसागर, येरवडा येथील रहिवासी, शिक्षण आचार्य अत्रे शाळा, नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालय व नवरोजी वाडिया कॉलेजम धून पूर्ण केले. जन्मभूमी आणि कर्मभूमी असलेल्या येरवड्यातील सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक अडचणी जवळून पाहिल्या मुळे त्यांनी लहानपणापासूनच सामाजिक कार्याची वाट धरली.

सन २००२ मध्ये त्या येरवड्यातून नगरसेविका म्हणून निवडून आल्या. पुणे मनपाच्या महिला बालकल्याण समितीमार्फत शहरात बचत गटांना मान्यता मिळवून दिली आणि महिलांना खादी ग्रामोद्योग, मिटकॉन, जिल्हा उद्योग केंद्र आदी संस्थांमार्फत उद्योग प्रशिक्षण दिले. २००५ मध्ये येरवडा पोलीस स्टेशनच्या सहकार्याने निर्भय अभियान व शालेय पोलीस दक्षता समिती स्थापन करुन विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवले, ज्यातून ५ बालविवाह रोखण्यात यश आले.

महिलांसाठी संगणक, आकाश कंदील, पणत्या, सुवासिक उटणे, बेसिक इंग्रजी आदी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले. यशदाच्या माध्यमातून नागरिकांना आरटीआयचे प्रशिक्षण दिले. २००२-२००७ नंतरही सामाजिक कार्य सुरु ठेवत २०२४ मध्ये ब्रेन वे फाउंडेशनमार्फत काउन्सेलिंग कोर्स करुन शालेय विद्यार्थी व महिलांचे समुपदेशन सुरु केले. महिलांवरील अत्याचार व विद्यार्थ्यांच्या समस्यांवर काम करण्यास त्या कटिबद्ध आहेत. समाजासाठीच्या या कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### आदरणीय श्री. गणेश धोडींबा घायमुक्ते, पुणे महानगरपालिकेसोबत सक्रियपणे सामाजिक कार्य



श्री. गणेश धोडींबा घायमुक्ते, वय ५३, येरवडा येथील रहिवासी व व्यवसायाने रिक्षा चालक, २०१६ पासून पुणे म हानगरपालिकेसोबत सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. ऑनलाईन व व्हॉट्सॲपद्वारे फोटोसह तक्रारी नोंदवून त्यांनी पाच हजारांहून अधिक तक्रारी प्रशासनापर्यंत पोहोचवल्या असून, त्यापैकी सुमारे तीन हजार तक्रारींवर यशस्वी तोडगा निघाला आहे.

येरवडा परिसरातील पाणीपुरवठा, रस्ते, वीज, स्वच्छता, सार्वजनिक शौचालये, रुग्णालयातील सुविधा, पूल दुरुस्ती, स्पीड ब्रेकर बसविणे, रस्त्यांचे डांबरीकरण अशा अनेक बाबींमध्ये त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. तारकेश्वर पूलावरील भगदाड दुरुस्तीपासून ते भवानी पेठ पोलिस लाईनच्या पाणीपुरवठ्याच्या समस्येपर्यंत आणि शाळा तसेच स्मारकासमोरील सोयीसुविधांपर्यंत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

गणेश घायमुक्ते यांचे कार्य केवळ तक्रार नोंदवण्यापुरते मर्यादित नसून, त्या तक्रारींचा निकाल लागेपर्यंत सततचा पाठपुरावा करणे ही त्यांची कार्यशैली आहे. त्यामुळे त्यांनी येरवड्यातील नागरिकांचा विश्वास संपादन केला असून, ते परिसरातील खरेखुरे जनतेचे प्रतिनिधी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या जनहितैषी कार्याची दखल घेत दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे, ज्यामुळे त्यांच्या प्रयत्नांना योग्य तो मान्यता लाभली आहे आणि ते अधिक जोमाने सामाजिक कार्य करण्यासाठी प्रेरित झाले आहेत.

### आदरणीय श्री. राजकुमार यशवंत गायकवाड, बी.ए., बी.एड. आणि एम.ए.



श्री. राजकुमार यशवंत गायकवाड यांचा ज न्म आणि बालपण सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील ति-हे या गावात झाले. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण त्यांनी ग्रामीण भागातील देगांव प्रशाला, ति-हे येथे इयत्ता दहावीपर्यंत पूर्ण केले. उच्च माध्यमिक शिक्षणापासून पदवीपर्यंतचा प्रवास त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, पुणे येथे केला. त्यानंतर पुणे विद्यापीठातून एम.ए. तसेच आदर्श शिक्षण मंडळ, कर्वे रोड, पुणे येथून बी.एड. पूर्ण केले,

बी.ए., बी.एड. आणि एम.ए. या तिन्ही पदव्या त्यांनी प्रथम श्रेणी व विशेष प्रावीण्यासह मिळवल्या, जे त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे द्योतक आहे. शिक्षणक्षेत्रातील कारकिर्दीत त्यांनी ११ वर्षे शिक्षक म्हणून कार्य करत विद्यार्थ्यांच्या घडणीत मोलाची भूमिका बजावली. त्यानंतर १७ वर्षे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत राहून शाळा विकास, शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने योगदान दिले. शिक्षणक्षेत्रातील त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत त्यांना दैनिक महा मेट्रो तर्फे सन्मानित करण्यात आले. त्यांच्या कार्यातून शिक्षणाबद्दलची निष्ठा, प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेची जपणूक स्पष्टपणे दिसून येते. त्यांच्या या प्रेरणादायी प्रवासातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ते एक आदर्श आणि प्रेरणास्रोत ठरले आहेत.

### आदरणीय श्री. संजय शिवाजीराव सोम वंशी, MSC, BED सामाजिक कार्य



श्री. संजय शिवाजीराव सोमवंशी, च.डल., इ.एव., यांनी शिक्षण क्षेत्रात ३२ वर्षे अखंड सेवा दिली असून सलग ३० वर्षे सुंदरबाई म राठे विद्यालय, खराडी, पुणे येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. विज्ञान विषयात नोकरीच्या सुरुवातीपासून आजपर्यंत १००% निकालराखत, शाळेचाही निकाल सतत शेकडा १००% ठेवण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेत वीज बचत, इंधन बचत, घनकचरा व्यवस्थापन, पाणी बचत यांसारखे अनेक अभिनव उपक्रम राबवले गेले आहेत. सामाजिक वनीकरण विभागाकडून शाळेला सलग पाच वर्षे पंचतारांकित हरित शाळा पुरस्कार, तर इंडियन रेड क्रॉस सोसायटीकडून सलग दोनदा सर्वोत्कृष्ट शाळा पुरस्कार मिळाला आहे. विद्यार्थ्यांच्या वाचन व उच्चार सुधारण्यासाठी ज्ञानेश्वरी पारायणासारखे उपक्रम, तसेच हरिपाठ, संस्कृत श्लोक, अभंग गायन स्पर्धांत राज्यस्तरीय प्रथम क्रमांक मिळवण्याचे यश मिळवले,

शाळेच्या परिसरातील खराब रस्त्याच्या डांबटीकरणासाठी मुलांना घेऊन यशस्वी आंदोलन केले. वीज बचत उपक्रमाच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी २००८ मध्ये राजभवन येथे त्यांना आणि विद्यार्थ्यांना खास भेट घेऊन गौरविले.

त्यांना पुणे मनपा, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ, विद्या सहकारी बँक, लायन्स क्लब, रोटरी क्लब यांसारख्या संस्थांकडून आदर्श मुख्याध्यापक पुरस्कारांसह अनेक मान-सन्मान प्राप्त झाले आहेत. त्यांनी कधीही स्वतःहून कोणत्याही पुरस्कारासाठी प्रयत्न न करता केवळ कार्याच्या जोरावर हे सन्मान मिळवले आहेत. या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे

### आदरणीय श्री. सुधीर गुलाबराव गांगर्डे, बी.एस्सी. (कृषी) व एम.एस्सी. (पर्यावरण)



श्री. सुधीर गुलाबराव गांगर्डे, मूळ गाव कोंभळी (ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) आणि सध्या हडपसर, पुणे येथे वास्तव्यास असून, त्यांनी बी.एस्सी. (कृषी) व एम.एस्सी. (पर्यावरण) शिक्षण घेतले आहे. ते १ जानेवारी १९९७ रोजी शासकीय सेवेत दाखल झाले. १९९७-२००० दरम्यान नाशिक जिल्हा मृदसंधारण विभागात कार्य केल्यानंतर, २०००-२०१२ या काळात येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे त्यांनी शेती उत्पादन वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले. याच काळात १७ एकर जागेवर भारतातील पहिले महिला खुले कारागृह उभारण्याच्या उपक्रमात त्यांनी आयजी, डीआयजी व गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्या सोबत म हत्त्वाची भूमिका बजावली.

२०१२-२०१८ दरम्यान कृषी भवन, पुणे येथील बीज परीक्षण प्रयोगशाळेत तांत्रिक अधिकारी म्हणून कार्यरत असताना, त्यांनी म हाराष्ट्रातील दुसऱ्या प्रयोगशाळेला एनएबीएल मानांकन मिळवून दिले, २०१८-२०२१ या काळात जिल्हा बीज प्रमाणीकरण यंत्रणेत सहाय्यक कृषी अधिकारी म्हणून कोविड-१९ काळात संपूर्ण पुणे जिल्ह्यात बीज प्रमाणीकरण व बियाणे चाचणीचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडले.

२०२१ मध्ये उप कृषी अधिकारी पदावर पदोन्नती मिळाल्यानंतर ते पुन्हा येरवडा खुले व मध्यवर्ती कारागृहात हजर झाले. येथे त्यांनी १० इमङ्क सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करून कैद्यांना प्रशिक्षण दिले, ज्यामुळे रासायनिक खतांशिवाय सकस भाजीपाला उत्पादन सुरु झाले. या उपक्रमामुळे त्यांची सिक्कीम राज्यातील सेंद्रिय शेती प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र शासनाकडून विशेष निवड झाली.

सध्या येरवडा खुले जिल्हा कारागृहात ४०-५० कैदी सेंद्रिय शेतीसोबत ७० देशी गायींचे पालन, १२० शेळ्यांचे पालन, कुक्कुटपालन, गांडुळ खत, नर्सरी आणि १२ बैलांच्या साहाय्याने पारंपरिक शेती करत असून, कारागृह प्रशासन अधिक स्वयंपूर्ण होत आहे. त्यांच्या या उल्लेखनीय उपक्रमांसाठी त्यांना २०२४ मध्ये पोलीस किसान संघटना, महाराष्ट्र शासन, पंढरपूर यांच्याकडून ङ्ककृषी द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून, दैनिक महा मेट्रो तर्फेही त्यांच्या कार्याचा विशेष गौरव करण्यात आला आहे.

### आदरणीय प्रा. महेश पुरुषोत्तम ढबाले, B.E. प्रोडक्शन आणि B.ED.



प्रा. महेश पुरुषोत्तम ढबाले यांनी B.E. प्रोडक्शन, B.Ed. तसेच आचार्य ही पदवी हिंदी विश्वविद्यालय, वर्धा येथून संपादन केली आहे. १९९९ साली चाटे कोचिंग क्लासेसमध्ये समुपदेशक म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करत, पुढे असिस्टंट ब्रांच मॅनेजर, मॅनेजर आणि सध्या विश्रांतवाडी व धानोरी शाखांचे संचालक म्हणून ते कार्यरत आहेत. पंचवीस वर्षांच्या या शिक्षण सेवेत त्यांनी घडवलेल्या विद्यार्थ्यांमध्ये नामांकित अभियंते, डॉक्टर, वकील, आयएएस व आयपीएस अधिकारी मोठ्या संख्येने असून, हे विद्यार्थी केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत.

उत्तम शिक्षक असण्यासोबतच प्रा. ढबाले है एक कुशल गायक व कवी आहेत. महाविद्यालयीन जीवनात त्यांनी त्रिवेणी संगम या चारोळी संग्रहाचे लेखन केले, ज्याचे प्रकाशन ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांच्या हस्ते झाले. ङ्कआईङ्ख या विषयावर अनेक कवींनी कविता रचल्या असल्या तरी प्रा. ढबाले यांच्या आई या कवितेचे वैशिष्ट्य असे की, ही कविता आईची १०८ रुपे प्रभावीपणे चित्रित करते. या कवितेला लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये मानाचे स्थान मिळाले असून, दरवर्षी मदर्स डेच्या दिवशी एफ.एम. रेडिओवरून तिचे वाचन केले जाते.

काव्यलेखनाबरोबरच ते एक प्रेरणादायी लेखकही आहेत. नुकतेच त्यांचे मास्टरिंग माईंड हे पुस्तक प्रकाशित झाले असून, या पुस्तकाच्या एक हजार प्रती अमेझॉनवर विकल्या गेल्या आहेत. शिक्षण, साहित्य आणि कलाक्षेत्रातील त्यांचे योगदान प्रेरणादायी असून, ते विद्यार्थ्यांसाठी तसेच समाजासाठी एक आदर्श व्यक्तिमत्त्व ठरले आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### आदरणीय प्राध्यापक डॉ. मंदार नाईक विश्वकर्मा युनिव्हर्सिटी, पुणे डिझाईन विभागाचे प्रमुख



प्राध्यापक डॉ. मंदार नाईक हे विश्वकर्मा युनिव्हर्सिटी, पुणे येथे डिझाईन विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत असून, डिझाईन क्षेत्रातील त्यांचा व्यापक अनुभव आणि सर्जनशीलतेची जाण विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी मोलाची ठरत आहे. कात्रज-कोंढवा रोड, पुणे येथे राहणारे डॉ. नाईक यांनी Bachelors of Fine in applied art (B.F..), Master of Fine arts in applied तसेच डिझाईन विषयात पीएच.डी. संपादन केली आहे.

त्यांनी महाराष्ट्र आरोग्य विभाग, पुणे यांच्या वतीने आयोजित आरोग्य विषयक चित्र कार्यशाळेत सहभाग घेऊन प्रभावी चित्रांच्या माध्यमातून लोकजागृती केली आहे. कोविड काळात त्यांनी विद्यापीठ स्तरावर जनजागृती अभियान राबवून स्वच्छतेविषयी ॲनिमेटेड कार्टून्स तयार करून विशेष योगदान दिले, जिल्हा परिषदेच्या मुळशी तालुक्यातील तव या दुर्गम भागातील शाळेत विद्यार्थ्यांना सध्याच्या काळातील ख आणि ॲनिमेशन यांची ओळख करुन देत अभ्यासाविषयी आवड निर्माण केली. तसेच शाळेतील भित्तिचित्रांद्वारे शेक्षणिक वातावरण सुशोभित केले.

सामाजिक व आरोग्यविषयक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. ङ्कजाणवणीङ्ख या उपक्रमातून त्यांनी अनेक जनजागृती कार्यक्रमांना हातभार लावला आहे. दैनिक महा मेट्रो वृत्तपत्रामध्ये त्यांनी विविध विषयांवरील लेखांसोबतच समाजजागृतीसाठी प्रभावी कार्टून्सही रेखाटली आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

सध्या विश्वकर्मा युनिव्हर्सिटीमध्ये विभाग प्रमुख म्हणून डॉ. नाईक विद्यार्थी वगर्गाला स्वयंरोजगार आणि नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी, विशेषतः आयटी व डिझाईन क्षेत्रात, सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या कार्यातून समाजहित आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीची निष्ठा स्पष्टपणे जाणवते.

### आदरणीय श्री. राजेंद्र खांदवे पाटील लोहगावचे बहुआयामी नेतृत्व



श्री. राजेंद्र खांदवे पाटील लोहगावचे सुपुत्र आणि संत तुकाराम महाराजांच्या आजोळ गावातील अभिमान असलेले राजेंद्र खांदवे पाटील हे शांत, संयमी, अभ्यासू आणि मनमिळावू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. सामाजिक प्रश्नांची अचूक जाण, उत्कृष्ट वक्तृत्व आणि राजकीय चातुर्य यामुळे त्यांनी स्थानिक तसेच पक्षीय पातळीवर ठसा उमटवला आहे. हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष, जिल्हा राष्ट्रवादी उपाध्यक्ष, वडगांवशेरी विधानसभा अध्यक्ष आणि सध्या पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी कार्य केले आहे.

त्यांनी २००३-०४ मध्ये हवेली तालुकाध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली आणि कार्यकाळ संपल्यानंतर त्यांच्या कार्यकुशलतेमुळे पुन्हा एकदा त्या पदावर निवड झाली. तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या पहिल्या नेमणुकीचे श्रेय स्वतः घेतले असले तरी, दुसऱ्या निवडीचे श्रेय त्यांच्या अपार मेहनतीला आणि कार्यक्षमतांना दिले. सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांसारख्या नेत्यांनी अनेक वेळा सार्वजनिक मंचावर त्यांच्या कार्याची प्रशंसा केली आहे.या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले.

### आदरणीय डॉ. शोभा सुपेकर मॅडम प्रमुख कार्यकारी अधिकारी, जनसेवा फाउंडेशन, पुणे



आदरणीय डॉ. शोभा सुपेकर मॅडम, प्रमुख कार्यकारी अधिकारी, जनसेवा फाउंडेशन, पुणे - आपल्या सामाजिक, शेक्षणिक आणि महिलांच्या सशक्तीकरणातील उल्लेखनीय योगदानाबद्दल दैनिक महा मेट्रो तर्फे हे मानपत्र प्रदान करताना आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो. एम.कॉम. (प्रथम श्रेणी) व उद्योजकता विकासातील पीएच.डी. प्राप्त करुन आपण ग्रामीण उद्योग, उद्योजकता विकास व मानव संसाधन व्यवस्थापन विषयात विशेष प्राविण्य मिळवले आहे. कस्तुरबा महिला खादी ग्रामोद्योग विद्यालयात प्राचार्या, गांधी राष्ट्रीय स्मारक सोसायटीत सहसचिव, संयुक्त राष्ट्रसंघाच्या ठशर्षीसशश थशश्रषरीश उशर्पीश मध्ये मुख्य समन्वयक, तसेच खादी व ग्रामोद्योग आयोगाच्या केंद्रीय प्रमाणपत्र समितीच्या सदस्य म्हणून आपण महत्त्वाची जबाबदारी पार पाडली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत अनेक संशोधन लेख प्रकाशित केले असून, एऊखख अहमदाबादचा राष्ट्रीय उद्योजकता प्रशिक्षक प्रेरक पुरस्कार, प्रियांदर्शनी इंदिरा गांधी पुरस्कार, राष्ट्रपतींकडून सर्वोत्तम प्रशिक्षण केंद्र पुरस्कार, ङ्कशी इज स्पेशलङ्ख यांसारखे अनेक सन्मान आपणास प्राप्त झाले आहेत. सिंबायोसिस कम्युनिटी कॉलेज व व्होकेशनल ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या आणि मणिलाल नानावटी व्होकेशनल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटच्या दहा वर्षांच्या संचालिका म्हणून आपण अनेकांचे जीवनमान उंचावले आहे. आपल्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडला असून, आपली वाटचाल प्रेरणादायी ठरली आहे. आपल्या कार्याला मनःपूर्वक सलाम!

# जल्लाद नव्हे हँगमॅन राज्यातील मध्यवर्ती कारागृहात हँगमॅन पदच नाही ; तुरूंग रक्षकावर सोपविली जाते जबाबदारी

**राज्यातील मध्यवर्ती कारागृहात एखाद्या गुन्हेगाराला फासी देणारा 'जलाद' हा शब्दप्रयोग चित्रपट आणि माध्यमांनी रंगविलेला आहे. कारागृहात 'जलाद ' हा हे पदच अस्तिवात नाही. त्याऐवजी 'हँगमॅन' चे काम एखाद्या कारागृहातील कर्मचाऱ्याला दिले जाते. हा कर्मचारी गुन्हेगाराला फासी देण्या अगोदर दोरखंड तयार करतो. त्यानंतर फासी देणाऱ्या गुन्हेगाराच्या वजनाच्या पुतळ्याला दोरखंडाच्या माध्यमातून फासी देण्याचा सराव करतो. त्यानंतर प्रत्यक्षात गुन्हेगाराला फासी देताना त्याची भूमिका चोख बजावतो. अशा या पडद्या मागील 'हँगमॅन' ची गोष्ट**

**पुणे । प्रतिनिधी**

देशात पन्नास पेक्षा अधिक कैदी फासीच्या शिक्षेच्या प्रतिक्षेत आहेत. एखाद्या गुन्हेगाराला फासीची शिक्षा सुनावल्यानंतर फासीची अमलबजावणी करण्यापर्यंत बराच कलावधी जातो. यामध्ये गुन्हेगार राष्ट्रपती यांच्याकडे दया याचनेचा अर्ज दाखल करतात. त्यावर राष्ट्रपतीनी हा दया याचनेचा अर्ज फेटाळल्यानंतर फासी देण्याची कार्यवाही सुरू होते. त्यानंतर संबंधित मध्यवर्ती कारागृहातील उंच व सशक्त अशा तुरूंग रक्षकावर 'हँगमॅन'ची जबाबदारी सोपविली जाते. हा तुरूंग रक्षक एखादे नेमून दिलेल्या कार्याप्रमाणे ( टास्क) जबाबदारी स्विकारतो.

दरम्यान 'हँगमॅन' कडे संबंधित फासी देण्यात येणाऱ्या गुन्हेगाराची सर्व माहिती येते. त्याचे वजन व उंची किती आहे हे महत्त्वाचे असते. त्याप्रमाणे या हँगमॅन दोरखंड वळायला लागतो. दोरखंड मजबूत होण्यासाठी त्याला तेल लावावे लागते. त्यानंतर फासी देणाऱ्या गुन्हेगाराच्या वजन व उंचीच्या धातूचा पुतळा बनविला जाते.

हा पुतळा घेऊन फासीच्या खोलीत हा हँगमॅन त्यावर सराव करतो. एकाच खटक्यात गुन्हेगाराला फासी लागणे आवश्यक असते. त्यासाठी तो अधून मधून सराव करत असतो.

कार्यवाहीत 'हँगमॅन'ची मानसिक स्थिती बदलते

हँगमॅनची भूमिका बजावताना त्याची मानसिक स्थिती बदलत असते. त्यासाठी मध्यवर्ती कारागृहात असणाऱ्या मानसोपचार तज्ज्ञांमार्फत त्याचे वेळोवेळी समुपदेश केले जाते. काही एखाद्या वेळेस दहशतवाद्याला फासी दिली असल्याचे हँगमॅनचे नाव गोपनीय ठेवले जाते.

एकदा फासी देण्याचे काम झाले कि तुरूंग रक्षक आपल्या नेहमीच्या कामावर रूजू होतो. केरळ सारख्या राज्यात हँगमॅनला दोन लाख रूपयांचे बक्षिस राज्य सरकारकडून दिले जाते. या स्वरूपाचे बक्षिस महाराष्ट्रात दिले जात नाही. पण विशेष सेवा पुरस्कार किंवा काही रोख रक्कम बक्षिस म्हणून दिले जाते.

सध्या येरवडा महिला कारागृहात पाच मुलांचे अपहरण करून हत्या केल्याप्रकरणी दोषी ठरलेल्या सीमा गावित आणि रेणुका शिंदे या बहिणी फाशीच्या प्रतीक्षेत आहेत कारण त्यांच्या क्षमा याचिकेवर निर्णय होण्याची प्रतीक्षा आहे.

येरवडा मध्यवर्ती कारागृहात फाशीची शिक्षा झालेल्या काही दोषींमध्ये कसाब, जिंदा-सुखा आणि अभ्यंकर-जोशी हत्याकांडातील चार तरुण होते. २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील मुख्य हल्लेखोर अजमल कसाब याला २१ नोव्हेंबर २०१७ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृहात फाशी देण्यात आलेली शेवटची व्यक्ती होती. यापूर्वी ऑपरेशन ब्लू स्टारचे नेतृत्व करणारे माजी लष्करप्रमुख दिवंगत जनरल अरुणकुमार वैद्य यांच्या हत्येप्रकरणी दोषी ठरलेले खलिस्तानी दहशतवादी जोडी जिंदा आणि सुखा यांना सुद्धा येरवडा मध्यवर्ती कारागृहात फासी देण्यात आली होती.

'' जलाद हा शब्दप्रयोग फक्त चित्रपट आणि माध्यमांनी रंगविलेला आहे. प्रत्यक्षात जलाद हा राज्यातीलच नव्हे तर देशाच्या कोणत्याच कारागृहात नाही. फासी देण्यासाठी कारागृहातीलच एखाद्या सशक्त अशा तुरूंग रक्षकाला काम दिले जाते. त्यासाठी त्याकडून साराव करून घेतला जातो. त्याचे एखाद्या गुन्हेगाराला फासी देण्याचे कार्य संपताच तो नेहमी प्रमाणे दैनंदिन कामाला लागतो.''

**- योगेश देसाई, विशेष पोलीस महानिरीक्षक , महाराष्ट्र कारागृह**